# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्रमांक 3 अंतर्गत वॉर्ड क्रमांक 03 व 04 याठिकाणी राबविण्यात आली "डीप क्लीन ड्राईव्ह" मोहीम**

स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार दिनांक 25 जानेवारी 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत, अति. आयुक्त संभाजी पानपट्टे व उपायुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे. प्रभाग समिती क्रमांक 3 अंतर्गत वॉर्ड क्रमांक 03 व 04 याठिकाणी "डीप क्लीन ड्राईव्ह" ही मोहीम राबविण्यात आली आहे.

बीपी रोड, नवघर रोड, तलाव रोड, एस.व्ही. रोड नाका, कस्तुरी पार्क, गोडदेव नाका इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये सर्व विभाग प्रमुखांनी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष साफसफाई, स्टीकर्स काढणे, प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई, शौचालय स्वच्छ करणे, पुतळे धुणे, तुटलेली झाकणे दुरुस्ती करणे, शहरातील रस्त्यांची, दुभाजकांची, बस स्टॉपची स्वच्छता अशी असंख्य कामे सकाळी 7.00 वाजल्यापासून दुपारी 2.00 वाजेपर्यंत करून घेतली. मा. आयुक्त यांनी रस्त्यावरील धूळ स्वच्छतेसाठी स्वतः पुढाकार घेत अग्निशमन दलातील वाहनाच्या जेट स्प्रे व पाण्याच्या फवाराच्या सहाय्याने रस्ता सफाई मोहीम राबवली. त्याचबरोबर मा. आयुक्त यांनी औद्योगिक परिसरात भेट देऊन अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचे निर्देश दिले. तदनंतर आयुक्त यांनी रेल्वे ट्रॅक, केबिन रोड लगत असलेल्या नाल्याबाबत आढावा घेतला. सदर "डीप क्लीन ड्राईव्ह" या मोहीमेत शहरातील जबाबदार नागरिकांनी सहभाग नोंदवून महापालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.